राज्यातील कुष्ठरोग पीडित नागरीकांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत "मुख्यमंत्री आवास योजना" राबविण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : प्रआयो २०१९/प्र.क्र.११२/गृनिधो-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
३ रा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-११ सप्टेंबर, २०१९

**वाचा:-** १) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक, प्रआयो २०१९/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि.०९.१२.२०१५

२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक, प्रआयो २०१७/प्र.क्र.१०८/गृनिधो-२, दि.०३.०२.२०१८

**प्रस्तावना :-**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत "सर्वांसाठी घरे -२०२२" बाबत केंद्र शासनाने सन-२०१५ मध्ये धोरण जाहीर केलेले आहे. सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्याकरीता राज्य मंत्रिमंडळाने दिनांक १ डिसेंबर, २०१५ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यांत आलेला आहे. सद्य:स्थितीत सदर योजना राज्यातील ३९० स्थानिक नागरी स्वराज्य संस्था, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणे, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC), नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (NAINA), सर्व कटक मंडळे (Cantonment Board) इ. च्या नियोजन क्षेत्रांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्याने सन २०२२ पर्यंत १९.४० लक्ष घरकूल निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेसंदर्भात गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांनी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार सर्वसाधारणपणे जी व्यक्ती आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) / अल्प उत्पन्न गट (LIG) /मध्यम उत्पन्न गटात (MIG) मोडते व तीचे संपूर्ण देशातील कोणत्याही भागात पक्के घर नाही, अशी व्यक्ती सदर योजनेंतर्गत लाभास पात्र ठरते.

उपरोक्त वाचा येथील क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

ACE Scanner

राज्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या सुमारे २.६४ % लोकसंख्या ही अपंग आहे. यापैकी सुमारे ८% लोकसंख्या ही कुष्ठपीडित आहे. अशा कुष्ठपीडित नागरीकांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मागणीचा/ बांधण्याचा अर्ज केला असल्यास अशा व्यक्तींना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या रु.२.५० लाख या अनुदानाव्यतिरीक्त अतिरीक्त रु.१.५० लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने **"मुख्यमंत्री आवास योजना"** राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

"मुख्यमंत्री आवास योजना" ही राज्यातील कुष्ठरोग पीडित नागरीकांसाठी विशेष योजना म्हणून प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेचे लाभ प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या कुष्ठपीडित नागरीकांना देण्यात येतील. सदर योजनेच्या अटींची पुर्तता करणारा लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत देय असणाऱ्या रु.२.५० लक्ष अनुदानाव्यतिरीक्त अतिरीक्त रु. १.५० एवढया लक्ष अनुदानास पात्र असेल. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्व सवलती या योजनेस लागू राहतील.

अ) अनुसुचित जातीच्या कुष्ठपीडित लोकांकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग या विभागामार्फत प्रती लाभार्थी रु.१.५० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान देण्यात येईल.

ब) अनुसुचित जमातीच्या कुष्ठपीडित लोकांकरीता आदिवासी विकास विभागामार्फत प्रती लाभार्थी रु.१.५० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान देण्यात येईल.

क) या व्यतिरीक्त उर्वरित गटातील कुष्ठपीडीत लोकांकरीता गृहनिर्माण विभागामार्फत महाराष्ट्र निवारा निधीमधून प्रति लाभार्थी रु.१.५० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान देण्यात येईल.

**सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढील अटींची पुर्तता करणे आवश्यक राहील** :-

१) सदर लाभार्थ्यांकडे कुष्ठपीडित असल्याबाबतचे प्रमाणपत्र (UDID कार्ड) असणे आवश्यक आहे.

२) भारतात कोठेही संबंधित व्यक्तीच्या किंवा त्यांच्या कुटुंबाच्या नावावर पक्के घर नसावे.

३) सदर लाभार्थी हा आर्थिकदृष्टया दुर्बल घटक ( वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.३ लाखापर्यंत) असणे आवश्यक आहे.

४) प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्व अटी व शर्ती या योजनेस लागू राहतील.

सदर योजनेंतर्गत प्राप्त अर्जांची उपरोक्त अटी व शर्तीनुसार छाननी करुन पात्र लाभार्थ्यांकरिता आवश्यक अनुदानाची परिगणना करुन त्याप्रमाणे संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी निधी मागणीचा प्रस्ताव म्हाडाकडे सादर करावा. अशा प्रकारे राज्यातील सर्व अंमलबजावणी यंत्रणांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांप्रमाणे संबंधित विभागांकडून निधी प्राप्त करुन घेऊन तो संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरित करण्याची जबाबदारी म्हाडा प्राधिकरणाची राहील.



PDF Scanner ACE Scanner

सदर योजनेचा गैर फायदा घेतल्याचे दिसून आल्यास संबंधीत लाभार्थी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाईस पात्र असेल.

सदरचा शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग तसेच वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२७/१९/व्यय-३, दिनांक ११.९.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१११४४७४७८१०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

DURGAPRASAD
POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2019.09.11 14:58:44 +05'30'

**( दुर्गाप्रसाद मैलावरम )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई. (पत्राने)
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सह अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ, साखर भवन, नरिमन पॉईंट, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपरनिकस मार्ग, नवी दिल्ली.
७) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
१३) मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१४) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
१५) सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी
१६) मुख्य अधिकारी, मुंबई/ कोकण /पुणे /नाशिक /औरंगाबाद /अमरावती /नागपूर - गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळे
१७) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.



PDF Scanner ACE Scanner